# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः31.10.2024** **वारःगुरुवार**

---

1. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त गुजरातमध्ये आयोजित राष्ट्रीय एकता दिवसाच्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं अभिवादन, सशस्त्र दलांना एकतेची शपथ.
2. दिवाळीचा सण देशभरात आनंद आणि उत्साहात सुरू. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून शुभेच्छा.
3. उत्तर प्रदेशात अयोध्येतल्या 55 घाटांवर 25 लाख 12 हजारपेक्षा जास्त पणत्या लावून सातवा गिनेस विश्वविक्रम.
4. उत्तर कोरियाकडून पूर्व किनारपट्टी भागात स्फोटकवाहू क्षेपणास्त्रांची चाचणी आणि
5. अल्बानियामध्ये तिराना इथं सुरू असलेल्या 23 वर्षांखालील जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या मानसी अहलावतला कास्यपदक.

**एकदा दिवस**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त गुजरातमध्ये आयोजित राष्ट्रीय एकता दिवसाच्या कार्यक्रमात सहभागी झाले. पंतप्रधानांनी गुजरातमधील एकतानगर इथं असलेल्या सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्टॅच्यू ऑफ युनिटीला पुष्पचक्र वाहिलं आणि एकता दिवसानिमित्त शपथ दिली. एकता दिवस संचलनही आज एकतानगरमध्ये सुरू आहे. विविध दलांच्या सोळा तुकड्यांच्या संचलनाबरोबर मार्शल आर्ट्स प्रात्यक्षिकं तसंच सूर्यकिरण विमानांची प्रात्यक्षिकंही आज होत आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज सकाळी दिल्लीत सरदार पटेल यांच्या पुतळ्याला पुष्पांजली वाहिली.

**शहा-दौरा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर आहेत. आज ते बोटाड इथल्या कष्टभंजन हनुमानजी मंदिराच्या गोपालानंद स्वामी भाविक भवनाचं उद्घाटन करणार आहेत. उद्या त्यांच्या हस्ते अहमदाबादमधल्या पिराना इथं कचऱ्यातून वीजनिर्मिती होणाऱ्या केंद्राचं उद्घाटन होणार आहे.

**दिवाळी संदेश**

देशभरात आज दिवाळीचा सण आनंद आणि उत्साहात साजरा केला जात आहे. घरोघरी पणत्या लावून, आकाशकंदिल लावून आणि रोषणाई करून प्रकाशाचा हा सण साजरा केला जात आहे. दिवाळीच्या निमित्तानं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. दिवाळीच्या सण हा आनंद आणि उत्साहाचा सण असून तो अज्ञानावर ज्ञानाच्या आणि वाईटावर चांगल्याच्या विजयाचं प्रतीक आहे असं राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे. हा सण म्हणजे गरीब आणि गरजूंना मदत करण्याची आणि आपला आनंद त्यांच्याबरोबर वाटून घेण्याचीही संधी आहे, असंही मत त्यांनी व्यक्त केलं आहे. नागरिकांनी प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करावी आणि आरोग्यदायी, संपन्न आणि जबाबदार समाज घडवण्याची शपथ घ्यावी असं आवाहनही त्यांनी केलं आहे.

दिवाळीचा सण फक्त भारतात नव्हे तर जगभरातल्या भारतीयांकडून आनंद आणि उत्साहात साजरा केला जातो, असं उपराष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. दिवाळीच्या सणाच्या प्रकाशानं देशाला एकात्मता, संपन्नता आणि अमर्यादित प्रगतीचा मार्ग दाखवावा अशा सदिच्छा त्यांनी व्यक्त केल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही समाजमाध्यमांवरून शुभेच्छा दिल्या आहेत. प्रकाशाच्या या सणाच्या निमित्तानं सगळ्यांना आरोग्यदायी, आनंदी आणि संपन्न आयुष्य लाभावं अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या आहेत. लक्ष्मीमाता आणि श्रीगणेशाच्या आशीर्वादानं प्रत्येकाला संपन्नता लाभावी असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<u>अयोध्या विक्रम</u>**

उत्तर प्रदेश सरकारनं काल उत्तर प्रदेशात अयोध्येतल्या 55 घाटांवर 25 लाख 12 हजारपेक्षा जास्त पणत्या लावून सातवा गिनेस विश्वविक्रम नोंदवला. रामजन्मभूमी मंदिराचं उद्घाटन झाल्यानंतरचा हा पहिलाच दीपोत्सव होता. काल शरयूच्या घाटांवर एकाच वेळी 1 हजार 121 बटूंनी आरतीही करून आणखी एक विक्रम केला. अयोध्येतला हा दीपोत्सव फक्त अयोध्या किंवा उत्तर प्रदेशासाठी नव्हे तर संपूर्ण देश आणि जगासाठी उल्लेखनीय आयोजन असल्याचं उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी म्हटलं आहे.

लडाखमध्ये कारगिल भागात काल लष्कराकडून दिवाळी साजरी करण्यात आली. त्यानिमित्तानं लष्कराकडून दिवे लावण्यात आले आणि आतषबाजीही करण्यात आली. लष्करी जवानांसह अनेक प्रशासकीय अधिकारी आणि इतरांनी उपस्थित राहून हा सण साजरा केला.

दरम्यान, दक्षिण आणि मध्य रेल्वेकडून दिवाळी आणि छटपूजा या सणांच्या निमित्तानं साडेआठशे विशेष रेल्वे फेऱ्यांची व्यवस्था केली आहे. सिकंदराबाद, हैदराबाद, कचिगुडा, विजयवाडा आणि तिरुपतीसारख्या महत्त्वाच्या स्थानकांमधील गर्दी लक्षात घेऊन विशेष फेऱ्या सोडण्यात येत आहेत. काही रेल्वेंना अतिरिक्त डबेही जोडण्यात येत आहेत.

**<u>छाननी</u>**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी 29 तारखेपर्यंत 288 मतदारसंघांसाठी 7 हजार 995 उमेदवारांचे अर्ज दाखल झाले होते. यापैकी 287 मतदारसंघातील 7 हजार पन्नास उमेदवारांचे अर्ज काल छाननीअखेर वैध ठरले आहेत. 917 उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले आहेत. नागपूर पश्चिम विधानसभा मतदारसंघातील एका उमेदवाराच्या अर्जाची छाननी आज होणार आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. 4 नोव्हेंबर अर्ज मागं घेण्याची शेवटची तारीख आहे.

**<u>उत्तर कोरिया चाचणी</u>**

उत्तर कोरियानं आज आपल्या पूर्व किनारपट्टी भागात स्फोटकवाहू क्षेपणास्त्रांची चाचणी घेतली. दक्षिण कोरियाच्या संयुक्त लष्करप्रमुखांनी एका निवेदनाद्वारे ही माहिती दिली आहे. मात्र, त्यात फार तपशील दिलेले नाहीत. उत्तर कोरियानं आपल्या सातव्या आण्विक चाचणीची तयारी केल्याबाबत दक्षिण कोरियाच्या गुप्तचर संस्थांना माहिती मिळाली आहे. तसंच अमेरिकेपर्यंत पोचू शकतील इतक्या क्षमतेच्या क्षेपणास्त्रांचीही चाचणी घेण्याइतपत उत्तर कोरियाची तयारी झाली आहे, अशीही माहिती दक्षिण कोरियाला मिळाली आहे. उत्तर कोरियानं युक्रेनविरुद्धच्या युद्धात मदत करण्यासाठी रशियाकडे आपल्या तुकड्याही पाठवल्या आहेत. या सगळ्या पार्श्वभूमीवर उत्तर कोरियाची आजची चाचणी महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

**<u>इस्राईल हल्ले</u>**

इस्राईलनं काल लेबनॉनच्या बालबेक शहरात हवाई हल्ले केले. इस्राईलनं वीस हल्ले केल्याचं बालबेकचे महापौर मुस्तफा अल शेरीफ यांनी सांगितलं. त्यामुळे हजारो नागरिकांनी सुरक्षितस्थळी धाव घेतली. हेजबोलाच्या इंधन साठ्यांना लक्ष्य करण्यात आल्याचं इस्राईलनं म्हटलं आहे. दरम्यान, हेजबोलाचा नवीन म्होरक्या नईम कासेम यानं उभयमान्य शस्त्रसंधी होईपर्यंत आपली संघटना लढत राहील असा इशारा दिला आहे. इस्राईलनं पॅलेस्टिनी भागात संयुक्त राष्ट्रांच्या मदतकार्याला प्रवेशबंदी केल्याबाबत

घेतलेल्या निर्णयावर आज तातडीची बैठक घेणार असल्याचं अरब लीगनं म्हटलं आहे. येमेनच्या नेतृत्वाखालील या संघटनेनं कैरोमध्ये ही बैठक घेणार असल्याचं म्हटलं आहे. गाझामधील पॅलेस्टिनी निर्वासितांसाठी मानवी भावनेतून केलं जाणारं मदतकार्य त्या भागातल्या मदतीचा कणा असून, कोणतीही संघटना त्यापासून परावृत्त करू शकणार नाही, असं संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेनं काल प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**महागाई भत्ता**

केंद्र सरकारचे कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांना महागाई भत्यात तीन टक्के वाढीची अधिसूचना केंद्र सरकारनं काल प्रकाशित केली. कर्मचारी, सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्तिवेतन मंत्रालयाच्या निवृत्तीवेतन आणि कल्याण विभागानं ही अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. केंद्र सरकारी कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांना वाढीव महागाई भत्ता एक जुलैपासून मिळणार आहे. केंद्रीय मंत्रिमंडळानं यापूर्वीच महागाई भत्यात वाढीचा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारचे निवृत्तिवेतनधारक किंवा कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना आता 53 टक्के महागाई भत्ता मिळेल, असं अधिसूचनेत नमूद करण्यात आलं आहे.

**हायलो बॅडमिंटन स्पर्धा**

जर्मनीत हायलो खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताचे आयुष शेट्टी आणि सतीशकुमार करुणाकरन यांनी पुरुष एकेरी विभागात उपांत्यपूर्व फेरीच्या आधीच्या फेरीत प्रवेश मिळवला आहे. आयुषनं फिनलँडच्या जोआकिम ओल्ड्रॉफचा 21-12, 21-17 असा पराभव केला, तर सतीशनं भारताच्याच चिराग सेनचा 22-20, 22-24,17-21 असा पराभव केला. महिला एकेरीत भारताच्या केयूरा मोपाती हिला डेन्मार्कच्या ऍना सिस रायबर्ग हिच्याकडून 8-21,12-21 असा पराभव स्वीकारावा लागला..

**फुटबॉल**

दक्षिण आशियाई फुटबॉल संघटना म्हणजे एसएएफएफतर्फे आयोजित महिला अजिंक्यपद स्पर्धेत बांगलादेशनं बाजी मारली आहे. काठमांडूमध्ये दशरथ स्टेडियमवर काल झालेल्या अंतिम सामन्यात बांगलादेशनं नेपाळचा 2-1 असा पराभव केला. अतिशय चुरशीच्या या सामन्यात मोनिका चकमा आणि रितूपर्णा चाकमा यांनी दोन गोल करून बांगलादेशचा विजयाचा मार्ग सोपा केला. यापूर्वी पाच वेळा अजिंक्यपद मिळवलेल्या भारताच्या संघाला रविवारी उपांत्य फेरीत नेपाळकडून पराभव स्वीकाराला लागला होता.

**जागतिक कुस्ती**

अल्बानियामध्ये तिराना इथं सुरू असलेल्या 23 वर्षांखालील जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या मानली अहलावतनं कास्यपदक मिळवलं आहे. 59 किलो वजनी गटात मानसीनं हे पदक मिळवलं. तिनं यापूर्वीची सुवर्णपदक विजेती सोलोमिया विनिक हिचा 4-0 असा पराभव केला. 65 किलो वजनी गटात मात्र भारताच्या मनीषा भनवाला हिला उपांत्यपूर्व फेरीत चीनच्या जिया लॉंगकडून 1-2 असा पराभव पत्करावा लागला.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.